संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# दबकत येणाऱ्या नववर्षा तुझे स्वागत आहे

कालाची गतिमानता खरे तर कधीही मोजता येण्यासारखी नसते. मनुष्याने केवळ आपल्या सोयीसाठी मिनिट, तास, दिवस, आठवडा, महिना आणि वर्ष अशी त्याची विभागणी करून कालाची मोजदाद करण्याचा केविलवाणा प्रयत्न केलेला जाणवतो. खरे तर हा काळ मोजत असताना काळ देखील आपल्याला जोखत असतो. मनुष्यातली शक्ती कार्यक्षमता आत्मविश्वास याची परीक्षा पहात असतो. कालचक्राच्या या सोयीनुसार इंग्रजी कालगणनेप्रमाणे २०१३ हे वर्ष संपले. आजपासून २०१४ या नव्या वर्षाला होणारी सुरुवात आत्मसंशोधनाची आणि सिंहावलोकनाची ठरायला हवी. मावळत्या वर्षामध्ये काळाच्या या विशाल पडद्यावर अनेक प्रसंगांची नोंद झाली. साधारणपणे गेले वर्ष हे प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन किंवा कौटुंबिक जीवनापासून ते सामाजिक जीवनापर्यंत फारसा दिलासा देणारे नव्हते. गेले वर्ष स्त्री अत्याचारांच्या घटनांनी गाजले तसेच भ्रष्टाचार आणि वेगवेगळ्या घोटाळ्यांमुळे सामाजिक जीवन खूप मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झालेले दिसून आले. घटना घडून जातात त्याचे परिणामही काही विशिष्ट कालावधीपर्यंत जाणवत राहतात. परंतु व्यक्तीसाठी किंवा समाजासाठी प्रतिकूल असलेली एखादी गोष्ट पुन्हा घडणार नाही, याची आज कोणीच शाश्वती देऊ शकत नाही आणि म्हणूनच काळाच्या या चक्रापुढे हाच मनुष्याचा सर्वात मोठा पराभव असतो. मनुष्याकडे आज कितीही बुध्दी असली, ताकद असली, पैसा असला तरी तो कालचक्र उलटे फिरवू शकत नाही. फक्त प्रतिकूल आणि अनुकूल घटना पुन्हा घडणार नाही किंवा मनुष्याला अधिकाधिक सुखी व समाधानी करण्यासाठी तो फक्त प्रयत्नांची शिकस्त करू शकतो. दुर्दैवाने कालचक्राच्या गतिमानतेमध्ये प्रतिकूल घटनांचा रेटा अधिक जाणवतो आणि अनुकूलता अभावानेच पहायला मिळते आहे. २०१३ तल्या अनेक कडू-गोड आठवणींचा ताळेबंद जर मांडला तर एकूणच व्यक्तिगत आणि सामाजिक पातळीवर सगळ्याच प्रकारच्या सुरक्षिततेविषयीची चिंता जाणवत राहते आणि म्हणूनच २०१४ या नवीन वर्षाचे स्वागत करताना ते किती मोकळेपणाने करावे असा प्रश्न निर्माण होतो. कारण ज्या अपेक्षा मनामध्ये ठेवून स्वागत करायला जावे तर त्याच्या विपरीतच अनेक गोष्टी घडण्याची शक्यता जाणवत राहते. यासाठीच या नववर्षाचे स्वागत करताना बाबा रे तू ये. मात्र तू तुझ्या भरोशावर ये असे म्हणण्याशिवाय पर्याय राहात नाही.

### अगदी कुटुंबापासून ....ते

अशा मनातल्या दबकत दबकत भावनांनीच या वर्षाचे स्वागत होत आहे. लोकांनी कितीही त्याला उत्सवी स्वरूप देण्याचा प्रयत्न केला शुभेच्छांचे मांडव टाकून शुभवर्तमानाच्या कितीही अक्षता टाकल्या तरी कुठेतरी मनामध्ये सगळेच किंवा अधिकाधिक शुभ घडेल याची शाश्वती देता येत नाही. कौटुंबिक पातळीवर आज ज्या पध्दतीची पडझड पहायला मिळते त्याबद्दल कोणाला दोष द्यावा असा प्रश्न पडतो. होणाऱ्या चुकादेखील कशा सुधाराव्यात असाही संभ्रम अनेक कुटुंबांमधल्या कर्त्यासवरत्यांमध्ये दिसून येतो. छोटे कुटुंब असूनही आपापसातले संवाद कमी होत आहेत, नको त्या गोष्टींवरून विनाकारण वाद होत आहेत. वाढत्या तंत्रज्ञानामुळे रक्ताची नातीसुध्दा दुरावताना दिसत आहेत. पूर्वीच्या काळी कोणत्याही चांगल्या निमित्ताने पत्र पाठवून एकमेकांना खुशाली कळवली जात होती. आज पत्राचा जमाना संपला. व्हॉटसअपवर, फेसबुकवर, ट्विटरवर किंवा ब्लॉगवर रोज भेटणारी मंडळी एकमेकांचे हालहवाल विचारत असतात, पण प्रत्यक्ष मदतीला हमखासपणे धावून येतील याची खात्री वाटत नसते. एखाद्या चित्रकाराने अमूर्त चित्राची अदाकारी करावी आणि त्यातला अर्थ शोधण्यासाठी रसिकांनी प्रयत्न करावेत. तशी परिस्थिती आज घराघरातल्या कौटुंबिक चित्राबाबत दिसून येते. तासन्‌तास व्हॉटस अपवर असणारी मुलंमुली किंवा पालक एकमेकांशी दिवसभरातून चार ताससुध्दा संवाद साधत नाहीत. उलट महिन्यातले जवळपास चाळीस तास मोबाईल आणि व्हॉटसअपवर खर्च होतात. सुट्टीच्या दिवशी घरी असणारे आई-वडील सलग दोन ताससुध्दा या लहानग्यांच्या वाटेला येत नाहीत. घरी असूनही त्यांचे मोबाईलवरचे बोलणे चालू राहते, असा एक मनाला चटका लावणारे सर्वेक्षण अलीकडेच एका संस्थेने केले होते. संवादांची साधने असूनही सुसंवादासाठी आवश्यक असलेली मने इतस्तत: विखुरलेली किंवा भरकटलेली दिसून येतात. याला काळाचा महिमा म्हणायचे की, मनुष्याने काळाच्याही पुढे जाऊन आपला महिमा गाण्याचा प्रयत्न केलेला म्हणायचे हेदेखील लक्षात येत नाही. तूर्त तरी त्याला 'कालाय तस्मै नम:' असे म्हणणे भाग पडते.

### ते.....थेट समाजापर्यंत

कौटुंबिक पातळीवरची ही वाताहत सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर तितक्याच व्यापक अर्थाने पहायला मिळते. बसमध्ये गाडीमध्ये किंवा रिक्षा टॅक्सीमध्ये आपल्या शेजारी बसलेला माणूस कोण आहे कसा आहे? याबद्दलचा विश्वास वाटत नाही आणि मग रात्री उशिरापर्यंत तरुण मुलींनी किंवा महिलांनी प्रवास करावा की करू नये इथपर्यंतच्या अनामिक भीतीने सामाजिक जीवन ग्रस्त दिसते. जणूकाही एखाद्या झाडाखाली सावली मिळेल, या आशेने तिथे जावे तर ते झाडच अंगावर कोसळावे. जीव वाचवण्याच्या हेतूने वैद्याकडे जावे तर त्यानेच आत्मघात करावा अशा प्रकारची बेभरवशाची, अविश्वासाची एक विचित्र वेदना सामाजिक पातळीवर ठसठसताना दिसते आहे. म्हणूनच नव्या वर्षाचे स्वागत कितीही मनापासून करायचे ठरवले तरी त्या स्वागताला या स्वगताचे म्हणजेच मनातल्या शंकांचे आवरण कायम राहते.